**पंतप्रधान नरेंद्र मोदींचा ब्राझीलच्या राष्ट्राध्यक्षांसोबत दूरध्वनी द्वारे संवाद (07 ऑगस्ट 2025)**

08 ऑगस्ट 2025

ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष श्री. लुईझ इनासियो लुला दा सिल्वा यांनी पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या समवेत आज (07 ऑगस्ट 2025) दूरध्वनी द्वारे संवाद साधला.

गेल्या महिन्यात ब्राझीलच्या दौऱ्याचे स्मरण पंतप्रधानांनी चर्चेप्रसंगी केले. व्यापार, तंत्रज्ञान, ऊर्जा, संरक्षण, कृषी, आरोग्य आणि नागरिक परस्पर संबंधांमध्ये सहकार्य बळकट करण्यासाठीच्या आराखड्यावर उभय नेत्यांनी सहमती दर्शविली होती.

या चर्चेवर भर देताना, उभय नेत्यांनी भारत-ब्राझील धोरणात्मक भागीदारीला नव्या उंचीवर नेण्याची आपली वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली.

उभय नेत्यांनी परस्पर हिताच्या विविध प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर विचारांचे आदान-प्रदान केले.

उभय नेत्यांनी परस्परांच्या संपर्कात राहण्याविषयी सहमती दर्शवली.

**नवी दिल्ली**

07 ऑगस्ट 2025